नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २०/०६/२०२१ (रविवार )

## दुचाकी वाहन चोरणारी टोळी गजाआड ४ मोटार सायकलसह २ लाखाचा मुद्देमाल हस्तगत नागपूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे आदेशाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री.अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक १९.०६.२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण परिसरात पेट्रोंलीग दरम्यान खात्रीशीर गोपनिय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील हमलापुरी फाटया जवळ तीन इसम मोटार सायकलसह उभे असुन ती मोटार सायकल चोरीची असण्याची शक्यता आहे. अशा माहितीवरून हमलापुरी फाटया जवळ जावुन नमुद तिन्ही संशयीत इसमांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यानी आपले नाव प्रितम केशव मेंढे वय २७, विकास ज्ञानेश्वर उके वय २३ वर्ष, विलास रामाजी बघेल वय २० वर्ष तिन्ही राहणार हमलापुरी, ता.रामटेक, जि.नागपूर असे सांगीतले. त्यांना त्यांचे जवळील बिना नंबर प्लेटच्या ग्रे (एम) रंगाची होंडा शाईन या वाहनाबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखविले नाही. त्यावरुन सदर मोटार सायकल ही चोरीची असल्याची संशय आल्याने नमुद तिनही इसमांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यानी सदर मोटार सायकल ही त्याचा साथीदार नामे समीर वसंता डोईफोडे, रा.बेरडेपार, ता.मौदा, जि.नागपूर याच्या मदतीने हिवरा हिवरी शेत शिवारातुन चोरली असल्याचे सांगीतल्यावरुन सदर मोटर सायकल च्या चोरीबाबत पोलीस स्टेशन रामटेक येथील अप.क्र. २४५/२०२१, कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा दाखल असल्याने सदर गुन्हयात त्यांना ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्यांनी वरील वाहन चोरी व्यतिरीक्त पो.स्टे.अरोली, पारशिवनी, मौदा हद्दीतुन आणखी ३ मोटार सायकल चोरी केल्याचे सांगीतले. त्यावरुन नमुद चार ही इसमांकडुन एकुण ४ मोटार सायकल किंमत २ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कायदेशीर कार्यवाहीस्तव पो.स्टे. रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पो.स्टे.रामटेक करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर राऊत, नापोशि राजेंद्र रेवतकर, दिनेश अधापुरे, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, विपीन गायधने, अमोल वाघ, चालक पोलीस नायक अमोल कुथे व सायबर सेल येथील पोलीस शिपाई सतिश राठोड यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## —: घरफोडी :—

**पो.स्टे.काटोल :—** अंतर्गत २ किमी अंतरावरील कडु जवंजाळ ले आउट काटोल येथे विजय भाउराव रेवतकर चे घरी भाडयाने राहणारे सौ. सोनु नामदेवजी कळमधाड वय २७ वर्ष रा. भिष्णुर चे पती दिनांक १९/०६/२०२१ चे ०४:०० ते ०४:३० वा. दरम्यान डयुटीवर जाण्यास झोपुन उठले असता, त्यांना घराचा दरवाजा हा बाहेरून बंद दिसल्याने फिर्यादीस उठवुन तिने किचनमध्ये जावुन पाहिले असता, तेथील असलेले कपाट उघडे व त्यातील सामान खाली असव्यस्त पडलेले दिसल्याने कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे ३ अंगठया, १) ३ ग्रॅमची २) ७ ग्रॅमची ३) साडेतीन ग्रॅमची, कानातील सोन्याचे झुमके साडेचार ग्रॅम असे एकुण १८ ग्रॅम सोने किंमत ५४,०००/— रूपये व नगदी १,००,०००/—रूपये असा एकुण १,५४,०००/— रू चा काल कोणीतरी अज्ञात इसमांनी रात्रीला घराचे खिडकीतुन हात टाकुन दरवाज्याची कडी काढुन आत प्रवेश करून चोरून नेले

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. सोनु नामदेवजी कळमधाड वय २७ वर्ष रा. भिष्णुर कडु जवंजाळ ले आउट काटोल विजय भाउराव रेवतकर यांचे घरी किरायाने चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन कटोलयेथे कलम ४५७,३८०,५११ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद केला असून आरोपीचा शोध घेणे सूरु आहे. पुढील तपास सपोनि प्रशांत लभाने मो.नं. ९८२३४३३८६३ हे करीत आहे.

## —: घरफोडी :—

**पो.स्टे.काटोल :—** अंतर्गत २ किमी अंतरावरील गुप्ता ले आऊट येथील निवासी नंदकिशोर भागवतराव खसारे वय ४८ वर्ष चे घरात दिनांक १८/०६/२०२१ चे २०/००ते १९/०६/२०२१ चे ०५/०० वा. दरम्यान अज्ञात इसमांनी दार उघडून घरात आत प्रवेश करून भिंतीला लटकलेली पर्समधील, सोन्याची लॉकेट असलेली ३ ग्रॅमची पोत किंमत ९००० रूपये व नगदी ठेवलेले नगदी ७००० रूपये असा एकुण १६,००० रू. चा माल चोरुन नेला

सदर प्रकरणी फिर्यादी नंदकिशोर भागवतराव खसारे वय ४८ वर्ष रा. गुपता ले आउट काटोल चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन कटोल येथे कलम ४५७,३८०,५११ **भा.दं.वि.** अन्वये गुन्हा नोंद केला असून आरोपीचा शोध घेणे सूरु आहे. पुढील तपास नापोका /२०८८संतोष आंधळे मो. क्र ८३८०८३३४२४ हे करीत आहे.

## —: चोरी (मोटार सायकल ):—

पो.स्टे.खापरखेडा :— अंतर्गत ०८ किमी अंतरावरील ग्रीन हेवन बार दहेगाव रंगारी येथे दिनांक १९/०६/२१ चे १७/०० ते १७/४५ वा दरम्यान पांडूरंग नागोराव डांगे वय— ३२ रा— वाकोडी त—सावनेर हा आपली मोटार सायकल हिरो होन्डा सी.डी. डिलक्स काळया रंगाची निळा व पांढरा रंगाची पटटा असलेली मोसा— क्र ४० के ५५१४ हॅन्डल लॉक करुन जेवन करायला गेला जेवन करुन परत आला असता त्याची मोसा दिसून आली नाही. कोनीतरी अज्ञात इसमांनी सदर मोटारसायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी पांडूरंग नागोराव डांगे वय— ३२ रा— वाकोडी त—सावनेर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ३७९ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा/३८१ गुरुप्रकाश मेश्राम मोनं—९८२३४५३१६३ हे करित आहेत.

पो.स्टे.रामटेक :— अंतर्गत ०५ किमी अंतरावरील मौजा हिवरा—हिवरी येथे दिनांक १८/०६/२१ रोजी ११.०० वा. चे सुमारास अमित केशव चौव्हान वय २७ वर्ष रा. हिवरा हिवरी हा आपली मोटारसायकल क्र एमएच ४० एएल १९१५ ग्रे (एम) रंगाची होंडा शाईन ने आपल्या शेतात गेला मोटार सायकल शेताचे किणाऱ्यात उभी करून शेतात गेला असता कोणीतरी अज्ञात इसमानी मोटारसायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी अमित केशव चौव्हान वय २७ वर्ष रा. हिवरा हिवरी चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३७९ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास नापोशि उकेबोन्द्रे पोस्टे रामटेक मो.न. ९८८१२४१०८९ हे करित आहेत.

## —: जबरी संभोग :—

**पो.स्टे.सावनेर :—** दि. १९/०६/२०२१ चे २१/०४ वा. यातील पिडीत फिर्यादी यांनें दिलेल्या बायाणावरुन तिचे व एक विधिसंर्घषीत बालक सोबत मागील दीड वर्ष पासून प्रेम संधब असून विधीसंर्घषीत बालक याने पिडीते ला जिवे मारण्याची धमकी देवून त्याचे राहते घरी बळजबरीने लैगींक अत्याचार केल्याने पिडीत गर्भवती होवून दि.१९.६.२०२१ चे ००.३० वा. दर तीचे राहाते घरी मुलाला जन्म दिले.

सदर प्रकरणी फिर्यादी ने दिलेल्या बयाणावरुन विधिसंर्घषीत बालक विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे अप क्र. ३२५/२०२१ कलम ३७६(१), ३७६ (२) (एन), ५०६ भा.दं.वी. सहकलम ४,६,बा.लै.अ.प्र.अ. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास म.स.पो.नि. सविता सावळा मो.नं. ९४०५५८८७१२ हे करित आहेत.

## —: दुखापत :—

पो.स्टे.कोंढाळी :— अंतर्गत बाजार चौक कोंढाळी येथे विशाल वासुदेव चन्ने वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. ५ कोंढाळी यांची मोबाईल शॉपी दुकान असून दिनांक १४/०६/२०२१ रोजी १२.३० वा. दरम्यान १) बबलु शेख २) गुड्डु शेख ३) समीर शेख सर्व रा. कोंढाळी यांनी आपले मोबाईल रिचार्ज करण्यास लावले असता त्यांचे मोबाईल रिचार्ज न झाल्याने संगणमत करून मोबाईल शॉपीचे दुकानात जावून विशाल वासुदेव चन्ने शिवीगाळ करून हातबुक्कीने मारहान करून त्याचे नाकावर हातबुक्कीने मारून नाकाचे हाड फॅक्चर केले

सदर प्रकरणी फिर्यादी विशाल वासुदेव चन्ने वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. ५ कोंढाळी चे तोंडी रिपोर्ट व वैद्यकीय रिपोर्ट वरुन अरोपी १) बबलु शेख २) गुड्डु शेख ३) समीर शेख सर्व रा. कोंढाळी चे विरुध्द पो. स्टे. कोंढाळी येथे अप क्र. १७०/२०२१ कलम ३२५,४२७,५०४, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले असून पुढील तपास सफौ दिलीप इंगळे मो.नं. ९०११११९५२२ हे करित आहेत.

## —: हयगयी ने मृत्यु :—

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २० किमी अंतरावरील नॅशनल हायवे क्र ५ महालगाव शिवारात दिनांक १९.०६.२१ चे ०९.३० वा. दरम्यान ट्रक क्र.यु.पी.५१ ये.टी.४४३२ चे चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजी पणे चालवुन श्रीकांत सुरेश डोगरे वय २८ वर्श रा. वासे लेआउट ता.कामठी यांचे वडीलांचे मोटारसायकल एम एच ३५ एन ८९५१ ला डाव्या बाजुने कट मारली त्यामुळे वडील रोडच्या डाव्या बाजुला स्लोपवर पडले त्याची आई सौ विनंता सुरेष डोगरे वय ४९ वर्श ही डांबरी रोडवर मध्यभागी पडल्याने ती ट्रकच्या मागच्या टायर मध्ये दबुन जागीच मरण पावली व फिर्यादीचे वडील सुरेष घनष्याम डोगरे वय ५५ वर्ष यांना अपघातामध्ये डोक्याला व हाताला व पायाला खरचटया सारखे मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी श्रीकांत सुरेश डोगरे वय २८ वर्श रा. वासे लेआउट ता.कामठी चे तोंडी रिपोर्ट वरुन ट्रक क्र.यु.पी.५१ ये.टी.४४३२ चा चालक आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्र. ३१८/२०२१ कलम २७९ ,३०४(अ) ३३७ भा द वी १८४ १३४ १७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास पोउपनि पोउपनि अरविंद मोहोड मो.नं. ९८२३९१०१५६ हे करीत आहे.

## —: दहशत निर्माण करणे :—

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०२ किमी अंतरावरील मौजा ममता रेस्टॉरेंट चे बाजूचे पसिरात दिनांक १९/०६/२०२१ चे १४.१० वा. ते १४.४५ वा. दर. १. मयुर विजय गोटे वय १९, २.आकाश ओमप्रकाश अजितवार वय २४ दोन्ही रा. गणेशपूर हे मो.सा. क्र. एमएच— ४० सीबी— ६४८१ वरुन गावात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने हातात तलवारी घेवून फिरत आहे. मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी दोन्ही आरोपीस ताब्यात घेवून एक लोखंडी तलवार व निमुळता मोठा चाकू जप्त केले.

सदर प्रकरणी फिर्यादी पोहवा/३८५ शैलेंद्र नागरे वय ५० पो.स्टे.एमआयडीसी बोरी चे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी १. मयुर विजय गोटे वय १९२.आकाश ओमप्रकाश अजितवार वय २४ दोन्ही रा. गणेशपूर चे विरुध्द पोलीस स्टेशन एमआयडीसी येथे अप क्र.१४६/२०२१ ४, २५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा शैलेंद्र नागरे मो.क्र. ७७४३९१९८०९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**